महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २३६ वे | दिनांक : २२/०८/२०२६ | वार : शनिवार

## कन्हैयाकुमार म्हणाले- 'छात्रों की गुंज' विरोधक सावित्रीबाईंवर दगडफेक करणारेच




**पुणे :** काँग्रेस नेते कन्हैयाकुमार यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. राहुल गांधींच्या २२ ऑगस्ट रोजी होणाऱ्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमाला विरोध करणारे तेच लोक आहेत, ज्यांनी सावित्रीबाई फुले यांच्यावर दगड आणि शेण फेकले होते, असे कन्हैयाकुमार म्हणाले. राहुल गांधी पुण्यात सावित्रीच्या लेकींशी संवाद साधणार आहेत. कन्हैयाकुमार यांच्या मते, राहुल गांधींच्या पुणे दौऱ्यामुळे भाजपने धसका घेतला आहे. त्यामुळेच ते कार्यक्रमात अडथळे आणण्याचा प्रयत्न करत आहेत. भाजपने कितीही अडवणूक केली किंवा अपप्रचार केला तरी 'छात्रों की गुंज' हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात यशस्वी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कन्हैयाकुमार यांनी भाजप सरकारच्या शैक्षणिक धोरणांवरही जोरदार टीका केली. मनुवादी विचारांनी देशातील शिक्षण व्यवस्था उद्ध्वस्त केली आहे. देशात दर तासाला दोन जवान आत्महत्या करत आहेत, २५ शाळा बंद होत आहेत आणि अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये बंद पडत आहेत, असे ते म्हणाले. 'ना पढे है, ना पढने देंगे' हे भाजपचे धोरण असून, त्यांचे पदवी प्रमाणपत्रही बनावट असल्याचा आरोप त्यांनी केला. भाजप नेत्यांची मुले परदेशात शिक्षण घेत असल्याने त्यांना या परिस्थितीचा फरक पडत नाही, असेही कन्हैयाकुमार म्हणाले. आज शिक्षण महागडे झाले असून ते सर्वसामान्य जनतेच्या आवाक्याबाहेर गेले आहे. पदवीसाठी ३० लाख रुपये खर्च करावे लागत असतील आणि ८० कोटी जनता ५ किलो धान्यावर जगत असेल, तर त्यांना हे महागडे शिक्षण कसे परवडणार, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. खाजगी शाळांना आमचा विरोध नाही, पण सरकारी शाळा बंद होता कामा नयेत, अशी भूमिका त्यांनी मांडली. महागडे शिक्षण घेऊनही नोकरीची शाश्वती नाही. परीक्षांचे पेपर फुटत आहेत आणि या सरकारला दहावीची परीक्षाही व्यवस्थित घेता येत नाही. सीबीएसईच्या परीक्षेतही घोटाळा झाल्याचा आरोप त्यांनी केला. शिक्षण हा आमचा अधिकार आहे, तो विशेषाधिकार बनवला जात आहे, असे कन्हैयाकुमार यांनी नमूद केले. कन्हैयाकुमार यांनी पुन्हा एकदा सांगितले की, राहुल गांधींच्या 'छात्रों की गुंज' कार्यक्रमाचा भाजपने धसका घेतला आहे. कोटा येथून सुरू झालेल्या या कार्यक्रमांना प्रत्येक वेळी अडवण्याचा प्रयत्न झाला, पण ते सर्व कार्यक्रम यशस्वी झाले. पुण्यातही परवानगी देताना अनेक अटी घालण्यात आल्या आहेत, पण अशा प्रयत्नांनी कार्यक्रम थांबणार नाही, तो मोठ्या प्रमाणात यशस्वी होईल यात शंका नाही, असे ते म्हणाले. भाजपने सोशल मीडियावर एक व्हिडिओ अपलोड करून 'छात्रों की गुंज' कार्यक्रमाबद्दल अपप्रचार सुरू केला आहे, पणया कार्यक्रमाला पैसे देऊन कोणाला आणण्याची गरज नाही, लोक स्वतःहून येत आहेत, असे कन्हैयाकुमार यांनी स्पष्ट केले. कितीही अडथळा आणला तरी राहुल गांधी येणार आणि कार्यक्रमही होणारच. राहुल गांधी अमित शाह यांच्यासमोर झुकले नाहीत, तर फडणवीस यांच्यासमोर कशाला झुकतील, असा सवालही त्यांनी केला.

## सदावर्तेंचे मराठा आत्महत्याग्रस्त कुटुंबांच्या नोकऱ्यांवर चॅलेंज



**बीड :** मित्र उमेश माने याच्या अनैतिक संबंधांतून निर्माण झालेल्या वादातून 21 जून रोजी झालेल्या विलास घुले खून प्रकरणात खासदार बजरंग सोनवणे यांच्या मुलाचा हात असल्याचा आरोप करत, त्याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्याच्या मागणीसाठी बीडमध्ये मोर्चा काढण्यात आला. या हत्या प्रकरणात सध्या 10 आरोपी न्यायालयीन कोठडीत असून, या प्रकरणात आता खासदारपुत्रावर कारवाईच्या मागणीसाठी आयोजित करण्यात आलेल्या या मोर्चामध्ये वकील गुणरत्न सदावर्ते यांनीही सहभाग नोंदवला. विलास घुले यांच्या पत्नीला नोकरी दिली पाहिजे. नोकरी नाही दिली तर मराठा आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या नोकऱ्यांना आम्ही चॅलेंज करणार, असा इशारा सदावर्ते यांनी दिला आहे. विलास घुले हत्याप्रकरणी विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आज बीडमध्ये आयोजित करण्यात आलेला मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलातून सुरू होऊन जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. या मोर्चाचे निवेदन स्वीकारण्यासाठी स्टेजवर आलेले उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्यात काही काळ शाब्दिक चकमक उडाली. मात्र, उपजिल्हाधिकाऱ्यांनी दिलगिरी व्यक्त केल्यानंतर अखेर सदावर्ते यांनी त्यांच्याकडे हे निवेदन सुपूर्द केले. या मोर्चानंतर ॲड. गुणरत्न सदावर्ते यांच्या उपस्थितीत मयत विलास घुले यांच्या कुटुंबीयांनी आपले उपोषण सोडले. प्रशासनाने येत्या आठ दिवसांत या प्रकरणी ठोस कारवाई न केल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. तसेच उपोषण सोडल्यानंतर सदावर्ते यांनी पत्रकार परिषद घेत घुले कुटुंबीयांना नोकरी देण्याची आग्रही मागणी केली. गुणरत्न सदावर्ते यांनी म्हटले की, मनोज जरांगेच्या माध्यमातून व्हायरस पसरवला जातो आहे. विखे आणि इतर मराठा मंत्र्यांनी समोर येऊन याबाबत सांगावे. महसूल खाते बावनकुळे साहेबांकडे नको म्हणून प्रयत्न सुरू आहे. नॉन मराठा महसुल मंत्री नको म्हणून टेंडर देण्यात आलेले आहे. यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा किती रोल आहे माहिती नाही. यापुढे जरांगे बावनकुळ्या म्हणून अपमान केला तर एकनाथ शिंद्या, एकनाथ्या म्हणून अपमान करेल. आमचा मास्टर प्लॅन आठ दिवसांत जाहीर करू. विलास घुले यांच्या पत्नीला नोकरी दिली पाहिजे. नोकरी नाही दिली तर मराठा आत्महत्याग्रस्त कुटुंबियांच्या नोकऱ्यांना आम्ही चॅलेंज करणार.'

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ ऑगस्ट २०२६

# ग्रामीण शिक्षणाच्या क्षितिजावर गुणवत्तेचा सुवर्णठसा; शिवाजी महाविद्यालयाचा प्रेरणादायी प्रवास

गुणवत्तेला कोणतेही भौगोलिक परिस्थितीचे कुंपण नसते आणि प्रतिभेला कोणत्याही शहरांची मक्तेदारी असत नाही, हे अजिठा डोंगराच्या कुशीत असलेल्या कन्नडच्या मातीने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बीड, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या चार जिल्ह्यांतील तब्बल पाचशे महाविद्यालयांच्या स्पर्धेत अव्वल ठरत, शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने एक नवा इतिहास रचला आहे. 'वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय' हा मानाचा सन्मान वा पुरस्कार मिळवून या महाविद्यालयाने केवळ स्वतःचाच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्यातील ग्रामीण शिक्षणाचा गौरव वाढवला आहे. हा सन्मान म्हणजे केवळ चार भिंतींच्या आत चालणाऱ्या शिक्षणाचा नव्हे, तर समाजाभिमुख ज्ञानविस्ताराचा आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विद्यापीठाने केलेला गौरव आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे शिवाजी महाविद्यालयाचे मूलभूत उद्दिष्ट राहिले आहे. १९७२ मध्ये स्थापन झालेल्या या महाविद्यालयाने ग्रामीण मराठवाड्यात उच्च शिक्षणाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून आपली ओळख निर्माण केली असून सुमारे २० एकर परिसरात विविध शैक्षणिक विभाग, ग्रंथालय, प्रयोगशाळा आणि विद्यार्थी विकासाच्या असंख्य सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. महाविद्यालयाला Fourth cycle NAAC यशस्वीपणे पूर्ण करून B++' दर्जाची पुनर्मान्यता प्राप्त आहे. विद्यापीठाने केलेला ही निवड म्हणजे ग्रामीण उच्च शिक्षणाच्या सामर्थ्यावर उमटलेली विद्यापीठाची अधिकृत मोहोर आहे. असे मी मानतो. हा सन्मान शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांतील कठोर तपश्चर्येचे व सातत्यपूर्ण परिश्रमांचे हे फळ आहे. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या नेतृत्वाखालील समितीने केलेल्या सर्वंकष मूल्यमापनात हे महाविद्यालय अव्वल ठरले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपुढे असणारे आव्हाने ओळखून, त्यांना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे संस्थेचे धोरण या यशाचा मुख्य पाया आहे. सुसज्ज प्रयोगशाळा, डिजिटल वर्ग, भाषा प्रयोगशाळा आणि समृद्ध ग्रंथालयाच्या जोडीला राबविले जाणारे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या सारखे उपक्रम विद्यार्थ्यांची खऱ्या अर्थाने सातत्याने वैचारिक मशागत हे महाविद्यालय करत आहे. उच्च शिक्षणाचा आत्मा हा संशोधनात असतो. महाविद्यालयातील प्राध्यापकांचे राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध आणि ज्ञाननिर्मितीचा ध्यास या महाविद्यालयाला खऱ्या अर्थाने 'विद्यापीठीय' दर्जा प्राप्त करून देतो. केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर न थांबता, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर येथे रोज भर दिला जातो. केंद्रीय युवक महोत्सवात सलग १० वर्षे 'सर्वोत्कृष्ट ग्रामीण संघ' म्हणून मिळविलेला बहुमान या संस्थेतील कलासक्त वातावरणाची साक्ष देतो. सोबतच एन.सी.सी., एन.एस.एस. आणि क्रीडा / स्पोर्ट्स क्षेत्रामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अनेक राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभाग घेत विविध पुरस्कार प्राप्त केले आहेत. शिक्षण हे समाजाभिमुख असावे, हा विचार शिवाजी महाविद्यालयात प्रत्यक्ष कृतीत उतरलेला दिसतो. 'कृषी मंच' आणि 'माती परीक्षण प्रयोगशाळेच्या' माध्यमातून संस्थेने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर विज्ञान पोहोचविले आहे. शिवाय, निव्वळ वृक्षारोपण न करता 'ऑक्सिजन पार्क' व 'बॉटनिकल गार्डन'च्या माध्यमातून उभारलेला 'हरित परिसर' आणि पर्यावरण संवर्धनासाठी मिळालेला महाराष्ट्र शासनाचा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्यस्तरीय पुरस्कार' हे संस्थेच्या निसर्गनिष्ठेचे उत्तम प्रतीक आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांच्या हाताला काम मिळणे अत्यंत गरजेचे आहे. यासाठी स्वतंत्र स्पर्धा परीक्षा केंद्र, पोलीस व अग्निवीर भरतीसाठीचे मैदानी तसेच लेखी प्रशिक्षण आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून युवकांच्या रोजगाराच्या वाटा प्रशस्त केल्या जात आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० (NEP-2020) ने अपेक्षित असलेल्या कौशल्याधिष्ठित, बहुविषयक आणि तंत्रज्ञानाधारित शिक्षणाच्या दिशेने टाकलेले हे अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. येत्या २३ ऑगस्ट रोजी विद्यापीठाच्या वर्धापनदिन सोहळ्यात संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. मानसिंहजी पवार व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले हे पुरस्कार स्विकारणार आहेत. तेव्हा हा महाविद्यालयाचा गौरव तर आहेच त्याचबरोबर शिस्तप्रिय, निःस्वार्थी, तत्वनिष्ठ आणि समाजाप्रती दातृत्वाची भावना असणारे, संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. मानसिंहजी पवार (बापूसाहेब) यांचाही तो सन्मान आहे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले सर यांचे उपक्रमशीलता, समर्पण, त्याग आणि योगदानाचे हे फळ आहे. महत्वाचे म्हणजे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती संजीवनी मानसिंह पवार, उपाध्यक्ष श्री. कृष्णा पाटील, सचिव श्री. चंद्रकांत देशमुख, कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब मोहिते, ज्येष्ठ संचालक डॉ. पी. के. निकम, डॉ. ए. के. महाले तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळाचे योग्य निर्णय आणि साथ महत्वपूर्ण आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले, उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, IQAC समन्वयक डॉ. विजय मातकर, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी आणि सेवकवर्ग यांच्या सामूहिक प्रयत्नाचे हे यश आहे. 'वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय' हा पुरस्कार शिवाजी महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण आणि बहुआयामी कार्यावर उमटलेली गुणवत्तेची हा मानाची तुरा आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना अधिक सक्षम, स्पर्धाशील आणि ज्ञानसमृद्ध घडविण्याची ही पावती आहे. ग्रामीण भागातून एक आदर्श आणि जागतिक दर्जाचे ज्ञानकेंद्र उभे करण्याच्या प्रवासातील हा एक प्रेरणादायी टप्पा आहे. असे मला वाटते. गुणवत्तेची ही शिखरे भविष्यात अशीच सर होत राहोत...! हीच सदिच्छा देत पुढील वाटचालीस अनंत शुभेच्छा...!

**डॉ. प्रकाश खेत्री**
**छत्रपती संभाजीनगर**

# आधुनिक भारताच्या उन्नतीत राजीव गांधी यांचे योगदान मोठे : प्रा. प्रशांत माठे




**करमाड, ता. छत्रपती संभाजीनगर :** भारतीय संस्कृती संवर्धन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, करमाड येथे राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाच्या वतीने सद्भावना दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. समाजामध्ये शांतता, बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि परस्पर सन्मानाची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. प्रशांत माठे उपस्थित होते तर प्रमुख उपस्थितीत प्रा. मनोज देवकर यांची उपस्थिती होती . कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. बाळासाहेब लिहिणार यांनी केले.प्रास्ताविकातून डॉ. बाळासाहेब लि . भारत हा विविध भाषा, धर्म, जाती, संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेला देश आहे. या विविधतेमध्ये एकता टिकवून ठेवण्यासाठी परस्परांमध्ये प्रेम, विश्वास, सहकार्य आणि बंधुभावाची भावना असणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.प्रमुख वक्ते प्रा. प्रशांत माठे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून यांच्या जीवनावर प्रकाश टाकला त्यासोबत भारतात तंत्र युगाची सुरुवात राजीव गांधी यांनी केली म्हणून आधुनिक भारतात राजीव यांचे मोलाचे योगदान आहे असे ते म्हणाले. सदभावना दिनावर बोलताना ते म्हणाले सद्भावना ही केवळ एका दिवसापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येकाच्या आचार-विचारांचा अविभाज्य भाग झाली पाहिजे, असे प्रतिपादन केले. समाजात जात, धर्म, भाषा, प्रांत किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक व्यक्तीचा सन्मान करणे हीच खरी सद्भावना आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनापासूनच सामाजिक समता, सहिष्णुता आणि बंधुभावाची मूल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन त्यांनी केले.ते पुढे म्हणाले की, राष्ट्रीय एकात्मता ही केवळ घोषणांमधून निर्माण होत नाही; ती आपल्या दैनंदिन वर्तनातून आणि परस्परांशी असलेल्या व्यवहारातून निर्माण होते. दुसऱ्याच्या मताचा आदर करणे, गरजू व्यक्तीला मदतीचा हात देणे, भेदभावाला विरोध करणे आणि समाजातील सर्व घटकांना समानतेने वागणूक देणे हीच सद्भावनेची खरी ओळख आहे.अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. शिक्षणाचा उद्देश केवळ पदवी मिळवणे नसून विद्यार्थ्यांमध्ये संवेदनशीलता, सामाजिक जाणीव, विवेकशीलता आणि जबाबदार नागरिकत्व निर्माण करणे हा आहे, असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांना समाजाशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असून अशा उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण आणि सामाजिक उत्तरदायित्व विकसित होते, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रकाश बांगर यांनी अतिशय सुबक पद्धतीने केले. कार्यक्रमाच्या शेवटी जिल्हा समन्वयक डॉ. कालिदास फड यांनी उपस्थितांचे आभार मानले.या कार्यक्रमास डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. नरेश डहाळे, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ. जयश्री पाटील,डॉ. सुखदेव पोटदुखे,प्रा. योगेश शिंदे, डॉ. नानासाहेब लावंड, डॉ. ललित गोल्डे , डॉ. इम्रान पठाण, डॉ. लक्ष्मण खरात, प्रा. तन्मय भावसार, डॉ. किशोर काळे, डॉ. सौरभ चव्हाण, डॉ. नितीन मुळे डॉ.निखिल साबळे डॉ. राऊत तसेच शिक्षकेतर कर्मचारी प्रसन्न वैद्य, भगवंत देशपांडे, रमेश जाधव, कैलास जाधव, मधुकर राठोड, ज्ञानेश्वर जाधव, अलका कुलकर्णी, सुनीता पारेकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक एकोपा, बंधुभाव, सहिष्णुता, राष्ट्रीय एकात्मता आणि माणुसकीची जाणीव अधिक दृढ झाली. विविधतेत एकता हीच भारतीय लोकशाहीची खरी ताकद असून प्रत्येकाने सद्भावनेची मूल्ये आपल्या जीवनात रुजवून समाज अधिक समताधिष्ठित आणि मानवतावादी बनविण्यासाठी योगदान द्यावे, असा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ ऑगस्ट २०२६


## सुधाकरराव नाईक जयंती व जलसंधारण दिन साजरा




**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात जलसंधारण अभियानांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने माजी मुख्यमंत्री मा. सुधाकरराव नाईक यांची जयंती आणि जलसंधारण दिन मोठ्या उत्साहाने सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमा पूजनाने त्यांना अभिवादन करून साजरा करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले, महिला प्रतिनिधी प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे, प्रा. डॉ. किसान लोहार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी सुधाकरराव नाईक यांच्या मुख्यमंत्री कालावधीत त्यांनी घेतलेल्या निर्णयाची उपयुक्तता आणि त्यांची यशस्वी कारकिर्द उलगडून दाखविली.सुधाकरराव राजुसिंग नाईक असे त्यांचे संपूर्ण नाव होते. ते भारतीय राजकारणी आणि जागतिक कीर्तीचे जलतज्ञ व निर्भीड पत्रकार होते. महाराष्ट्राचा पाणीदार नेता आणि जलक्रांतीचे जनक म्हणून सुधाकरराव नाईक देशभर ओळखले जातात. सरपंच, सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष, राज्यमंत्री, कॅबिनेट मंत्री , मुख्यमंत्री आणि राज्यपाल असे लोकशाही व्यवस्थेमधील एक मोठे आवर्त त्यांनी पूर्ण केले. असे पहिल्या ते सर्वोच्च स्थानावर विराजमान होणारे कदाचित ते एकमेव नेते मानले जातात असे सांगून प्रा. डॉ . बालाजी कोनाळे यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सालसपणा प्रत्येकाना भावणारा होता., असे संबोधन केले. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. भाऊसाहेब उगले यांनी उपस्थित सर्वांना जलसंधारणाची सामूहिक शपथ दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बालाजी कोनाळे यांनी केले तर आभारप्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेच्या महिला प्रतिनिधी प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे यांनी केले. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

## ‘जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ‘ज्येष्ठ नागरिक आदरभाव’ परिसंवाद ज्ञानसत्र संपन्न



**नाशिक (प्रतिनिधी) :** साजऱ्या होणाऱ्या ‘जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त ‘ज्येष्ठ नागरिक आदरभाव’ या विषयावर परिसंवाद ज्ञानसत्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या यशवाणी वेब रेडीओवर विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांची संकल्पना व प्र- कुलगुरू डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शक सूचनेनुसार २३ वे ज्ञानसत्र घेण्यात आले. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाचे प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या ज्ञानसत्राचे समन्वयन व सूत्रसंचलन आणि आभार प्रदर्शन यांनी केले.२१ ऑगस्ट रोजी संपूर्ण जगात साजऱ्या होत असलेल्या ‘जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त’ सदर परिसंवाद घेण्यात आला. ज्ञानात्मक समाजनिर्मितीसाठी ज्येष्ठ नागरिकांचे जीवनातील विविध पैलू यश अपायश स्थिरता इत्यादी संचित दायित्वाचा आदरभाव विचाराची प्रगल्भता आणि सन्मान यातून व्यक्त होतो असे प्रतिपादन सर्वच ज्ञानसत्र परीसंवादाकानी केले. त्याच बरोबर सल्लगाराची भूमिका आणि पारंपारिक संवाद आत्मविश्वास इत्यादीचे संचीतही ज्येष्ठ नागरिकांकडे असते त्याचे कुटुंबाबरोबरच समाजानेही लाभ घ्यावेत. या परिसंवादात प्रथम परिसंवादक डॉ . सचिन पोरे यांनी ‘ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व समाजाने घ्यावयाची काळजी’ या विषयावर विचार व्यक्त केले. तर द्वितीय परिसंवादक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी ‘ज्येष्ठ नागरिकांचे हक्क : सन्मानाची खरी कसोटी’ या विषयावर विचार मांडले तर तृतीय परिसंवादक डॉ. वासुदेव राऊत यांनी 'ज्येष्ठ नागरिकांचे शिक्षण आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची भूमिका' या विषयावर विचार मांडले. हा कार्यक्रम अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी

https://avc.ycmou.ac.in

या विद्यापीठ संकेतस्थळावर कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यासाठी विद्यापीठ दृक्श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जयदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तंत्रसहाय्यक श्री. प्रकाश सापनर, श्री. गिरीश गवळी यांनी तांत्रिक परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचा अध्ययनार्थी, शिक्षक, संशोधक तसेच सर्व नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यासनप्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. दिपक राजगिरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## मुरूम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयात जल संवर्धन दिन उत्साहात संपन्न




***फोटो ओळ :*** *मुरूम, ता. उमरगा येथील माधवराव पाटील महाविद्यालयात व्याख्यानाप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विलास खडके, मंचावर चंद्रकांत बिराजदार, महेश्वर होगाडे व अन्य.*

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जल संवर्धन दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी (ता. २१) विशेष मार्गदर्शन व जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात मानवी जीवनातील पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. डॉ. विलास खडके यांनी भारतीय संस्कृतीतील पंचमहाभूतांपैकी 'आप' (जल) चे महत्त्व सांगताना "जल हेच जीवन आणि जीवन अनमोल आहे" असा संदेश दिला. वाहत्या पाण्यामधून नम्रता, विनय आणि अहंकाराचा त्याग हे गुण शिकायला मिळतात, असे त्यांनी स्पष्ट केले. पृथ्वीवर ७१ टक्के पाणी आणि २९ टक्के जमीन असून, यापैकी केवळ ३ टक्के पाणीच पिण्यायोग्य (गोडे पाणी) आहे. या मोजक्याच पाण्यावर संपूर्ण जगाची लोकसंख्या, उद्योगधंदे, कृषी आणि व्यवसाय अवलंबून असल्याने पाण्यावर प्रचंड ताण येत आहे. जंगलतोड, पर्यावरणाचा ऱ्हास, जलप्रदूषण, पाण्याचा अतिवापर आणि अपव्यय यांमुळे जलसंकट निर्माण झाले असून, निसर्गाची अनियमितता आणि वाढत्या मागणीमुळे जलसंवर्धन काळाची गरज बनले आहे. पाण्याचे योग्य नियोजन, वितरण, वापर, संरक्षण, प्रदूषणावर नियंत्रण आणि लोकांचा सक्रिय सहभाग याद्वारे जलाचा शाश्वत वापर करणे सर्वांचे आद्य कर्तव्य असल्याचे वक्त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी माधवराव पाटील कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. महेश्वर होगाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.प्रास्ताविक प्रा. डॉ. जयश्री सोमवंशी यांनी केले.सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुजित मटकरी तर आभार प्रा. डॉ. रमेश आडे यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विविध शाखांचे विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


MAHARASHTRA JANSHAKTI NEWS.COM
MAHARASHTRA JANSHAKTI
MJ NEWS

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ ऑगस्ट २०२६


# पालकांनी मुलांना आवड ओळखण्याची संधी द्यावी




**कन्नड (अरुण थोरात) :** ग्रामीण भागातील मुलांत आपले भविष्य घडविण्याची क्षमता आहे. आवड आणि आत्मविश्वास या दोन बाबीच त्यांचे आयुष्य घडवू शकतील यासाठी पालकांनी ही संधी उपलब्ध करुण देणे गरजेचे असल्याचे मत कन्नड चे युवानेतृत्व आदित्यवर्धन जाधव यांनी व्यक्त केले आहे.ते दि.20 ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळंकी ता. कन्नड येथे आयोजित 'दहावी नंतर चे मार्ग' कार्यक्रम प्रसंगी बोलत आहे.अलीकडे मुले दहावी नंतर पुढील शैक्षणिक करियर घडविण्यासाठी कोचिंग क्लासेस किंवा भरती या कडे वळालेले दिसत आहे. भरमसाठ पैसे व वेळ खर्च करुन शेवटी त्यांच्या पदरी निराशाच येते. यातील बोटावर मोजण्या इतकी मुलेच यशस्वी होतात. बाकी सर्व मुली घरी येऊन आपल्या पारंपरिक व्यवसाय किंवा शेतीकामाला लागतात. ग्रामीण भागातील सर्व मुले हुशार आहेत. मात्र त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असल्याचे मत आदित्यवर्धन जाधव यांनी व्यक्त केली.यावेळी शिष्यवृत्ती परिक्षेत पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थी व पालकांचा गुणगौरव व सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन शिक्षक दादासाहेब पोकळे यांनी केले. उपस्थितांनी शाळेतील डिलीट यंत्रणेची पाहणी करुण शाळेचे कौतुक केले. भविष्यात शाळेसाठी लागणाऱ्या सुविधा उपलब्ध करुण देण्याचे आश्वासन देण्यात आले.याप्रसंगी आदित्यवर्धन जाधव यांसह वडनेर चे सरपंच मुलचंद पवार, कोळवाडीचे सरपंच दत्तू सोनावणे, मा.उपसरपंच हरिश थोरात, अरुण थोरात, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रमेश थोरात, उपाध्यक्ष मच्छिंद्र वाकळे, अनिल थोरात, गजानन पडवळ, गोकुळ थोरात, दिगंबर वाणी, नवनाथ पडवळ, चतुर्भुज थोरात, बाळू थोरात, गुलाब कदम, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक मुक्तानंद गोस्वामी, शिक्षक बालाजी चोपणे, श्री सौंदणकर, श्री ठाकरे, श्री सारंग, गणेश दरवंटे, आदींसह पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शंकरराव पाटील महाविद्यालयात स्व. सुधाकरराव नाईक जयंती व जलसंधाराची शपथ



**भूम :** शंकरराव पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे स्व. सुधाकरराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्ताने स्व. सुधाकरराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन करून जलसंधारणाची शपथ घेण्यात आली.यावेळी पाण्याचे महत्त्व ओळखून पाण्याचा काटकसरीने वापर करणे, पाण्याची नासाडी टाळणे, जलस्रोतांचे संवर्धन करणे तसेच जलसंधारणाच्या विविध उपाययोजनांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प करण्यात आला. 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संदेशातून जलसंवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले.या कार्यक्रमासाठी संस्थेचे उपाध्यक्ष डी. डी. बोराडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या अनुराधा जगदाळे होत्या. तसेच संस्थेचे सहसचिव प्राचार्य संतोष शिंदे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नंदू जगदाळे यांनी केले, तर राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. संतोष भांडवलकर यांनी आभार मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी, तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

# आई-वडिलांची सेवा हीच खरी ईश्वरसेवा, समाज प्रबोधनाचा दिला संदेश



**कन्नड (अरुण थोरात) :** देभेगाव (ता. कन्नड) येथील ज्येष्ठ नागरिक तथा समाजातील आदर्श व्यक्तिमत्त्व कै. कारभारी प्रभात पा बोडखे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त आयोजित करण्यात आलेल्या समाज प्रबोधनपर कीर्तन सोहळ्यास भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील (बुलढाणा) यांच्या रसाळ व विचार प्रवर्तक कीर्तनातून अध्यात्म,संस्कार, कुटुंबव्यवस्था आणि समाजसेवेचा प्रभावी संदेश देत कै. कारभारी पाटील यांच्या पवित्र स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कीर्तनादरम्यान पुरुषोत्तम महाराज यांनी "आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ सेवा असून, त्यांची मनापासून सेवा करणाऱ्या मुलांवर देवाची सदैव कृपा राहते" असा हृदयस्पर्शी संदेश दिला. आजच्या धकाधकीच्या जीवनात वृद्ध आई-वडिलांना वृद्धाश्रमात पाठविण्या ऐवजी त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत प्रेम, आदर व मायेने सेवा करणे हे प्रत्येक मुलाचे प्रथम कर्तव्य असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. यावेळी त्यांनी नामस्मरणा चे महत्त्व, संतपरंपरे चे विचार, कुटुंबातील एकोप्याची गरज, व्यसनमुक्ती, नैतिक मूल्यांचे जतन, समाजातील वाढती स्वार्थी वृत्ती, पालकां विषयीची कृतज्ञता तसेच धर्म आणि मानवतेचा खरा अर्थ यावर अत्यंत प्रभावी विवेचन केले. कीर्तनातील भावपूर्ण निरूपणा मुळे अनेक भाविकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात महाराजांच्या विचारांचे स्वागत केले.संगीत विशाद ह भ प नारायण खिल्लारे (पुणे), संगीत अलंकार ह भ प सदानंद कडूळे (आळंदी), मृदुंग सम्राट ह भ प भरत महाराज पठाडे (बीड) त्यांची ही साथ लाभली. या कार्यक्रमास संभाजीनगर जिल्ह्याचे खा. संदिपान जी भुमरे, आ. संजनाताई जाधव, मा. आ. नामदेवराव पवार, मा.आ. नितीन पाटील, मार्केटिंग फेडरेशनचे संचालक पांडुरंग पा घुगे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख डॉ. मनोज राठोड, नगरसेवक सुरेश डोळस, खरेदी विक्री संघाचे कैलास अकोलकर, खरेदी विक्री संघाचे चेअरमन ज्ञानेश्वर निकम, विविध गावांचे सरपंच, जि.प. सदस्य, डॉ. संजय गव्हाणे, मा. उपनगराध्यक्ष डॉ. सदाशिव पाटील, डॉ कृष्णा सपकाळ, बहिरगावंचे आदर्श शेतकरी बापू सोनवणे, कामगार नेते शिवाजी थेटे, शहरप्रमुख राम पवार, पं.स. सदस्य सिद्धेश्वर झाल्टे, किशोर पवार, संजय भागवत, युवा नेते संतोष जाधव, सुदाम पा बोडखे, व बोडखे परिवारातील नारायण बोडखे, संतोष बोडखे, संगीताताई, कैलास औताडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.कै. कारभारी बोडखे यांनी आयुष्यभर जपलेले सामाजिक मूल्य, माणुसकी, सेवाभाव आणि कुटुंबवत्सल संस्कार यांचे स्मरण या कार्यक्रमातून करण्यात आले. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ आयोजित कीर्तनाने उपस्थितांना अध्यात्मा बरोबरच समाज प्रबोधनाचा अनमोल संदेश दिला. हा कार्यक्रम केवळ पुण्यस्मरण न राहता समाजाला दिशा देणारा आणि प्रत्येकाने आपल्या आई-वडिलांची सेवा करण्याचा संकल्प करणारा प्रेरणादायी सोहळा ठरला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ ऑगस्ट २०२६


## मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**बीड (भगवंत पाळवदे) :** इतर मागास वर्ग, विशेष मागास प्रवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील बारावी नंतरच्या बिगरव्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष 2026-27 करीता शासकीय वसतीगृह, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दिनदयाळ स्वयंम योजना भटक्या जमाती क-प्रवर्गासाठी या योजनांचे ऑनलाईन वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर दि.31 ऑगस्ट 2026 पर्यंत ऑनलाईन सादर करून विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे इतर मागास बहुजन कल्याण विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे. बीड नगरपरिषद हद्दीपासून 10 किमी अंतरामधील महाविद्यालयामध्ये प्रथम वर्ष आणि थेट द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनीच केवळ वसतीगृह योजनेसाठी अर्ज करावा. बीड तालुका वगळता, जिल्ह्यातील उर्वरित सर्व तालुक्यातील विद्यार्थ्यांनी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडित दिनदयाळ स्वयंम योजनांसाठी अर्ज करावा. बीड तालुका व्यतिरिक्त इतर तालुक्यातील विद्यार्थ्यांनी शासकीय वसतीगृहासाठी अर्ज करू नये. पात्र विद्यार्थ्यांनी मुदतीत ऑनलाईन अर्ज भरून या शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात आले आहे






## कोरोनामुळे पतीचे निधन झालेल्या एकल महिलेचा पुनर्विवाह स्वत: देवाभाऊंनी लावून दिला





**बीड /अंबाजोगाई - भगवंत पाळवदे :** मंगलाष्टके सुरू होतं… आणि अलगद तिच्या डोळ्यात अश्रू आले. पण आज ते अश्रू दु:खाचे नव्हते… ते आनंदाचे समाधानाचे अश्रू होते.कारण काही वर्षांपूर्वी याच ताईला वाटलं होतं, आपलं आयुष्य आता संपलं. कोरोना काळात आपल्या पतीला गमावल्यानंतर पुढचं आयुष्य कसं जगायचं, हा प्रश्न तिच्यासमोर उभा राहिला होता. संसार नुकताच सुरू झाला होता आणि एवढ्या कमी वयात तिच्या वाट्याला वैधव्याचं दु:ख आलं होतं.पण त्याच वेळी तिच्या आयुष्यात दोन भाऊ आले… तेव्हाचे विरोधी पक्षनेते आणि आताचे आपले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी आमदार संदीप जोशी.तुम्हाला माहिती आहे का ?कोरोना काळात नागपूर मधील १९ ते २५ वयोगटातील जवळपास २९३ मुलींनी आपल्या पतीला गमावलं होतं. एवढ्या कमी वयात या मुलींच्या आयुष्यात आलेलं हे दु:ख खरंच मोठं होतं. पण ही गोष्ट देवाभाऊंना पाहवली नाही. या मुलींच्या आयुष्याची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेतला गेला. देवाभाऊंनी १०० परिवारांचं पालकत्व स्वीकारलं आणि माजी आमदार संदीप जोशी यांनीही बाकीच्या परिवारांची जबाबदारी घेतली.तेव्हापासून आजपर्यंत त्यांच्या शिक्षणाचा, त्यांच्या गरजांचा आणि त्यांच्या भविष्यासाठी लागणाऱ्या गोष्टींचा खर्च उचलला गेला.हे तुम्हालाही माहिती नव्हतं ना?कारण त्या गोष्टीचा कुठेही गाजावाजा केला नाही… कुठे स्वत:च्या कामाच्या जाहिराती नाहीत… पण जबाबदारी मात्र शेवटपर्यंत निभावली.आणि आज त्या जबाबदारीचा एक अतिशय भावनिक क्षण प्रीती ताईच्या आयुष्यात आला होता.आज त्यांचा पुनर्विवाह होता.प्रत्येक मुलीच्या आयुष्यातला लग्नाचा दिवस हा भावनिक असतो. पण प्रीती ताईसाठी आजचा दिवस आणखी वेगळा होता. कारण ज्या आयुष्यात एकदा सगळं संपल्यासारखं वाटलं होतं, त्याच आयुष्यात आज पुन्हा नव्या संसाराची सुरुवात होत होती. आणि त्या सुरुवातीच्या वेळी तिच्या पाठीशी उभे असलेले तिचे दोन्ही भाऊ आजही तिच्यासोबत होते.मंगलाष्टके सुरू झालं… समोरून अक्षता तिच्या अंगावर आल्याआणि नकळत तिच्या डोळ्यातून अश्रू आले.आणि मग तो क्षण आला…देवाभाऊंनी स्वत: प्रीती ताईच्या पदराची गाठ शिवम यांच्या सोबत बांधली… तिचा हात शिवम यांच्या हातात दिला… आणि तिच्या आयुष्याची ही नवी, सुखद गाठ बांधून दिली.काही वर्षांपूर्वी ज्या ताईच्या आयुष्यात संसाराची गाठ अचानक सुटली होती, आज त्याच ताईच्या नव्या संसाराची गाठ तिचा भाऊ स्वत: बांधत होता.तो क्षण शब्दांत सांगण्यापेक्षा अनुभवण्याचा होता.देवाभाऊंच्या हातून तिच्या पदराची गाठ बांधली जात होती… समोर तिचं नवं आयुष्य उभं होतं… आणि डोळ्यांत आलेले ते अश्रू पाहताना तिथे उपस्थित असलेल्या प्रत्येकाचं मन भरून आलं असेल.आपल्याला माहितीये..देवाभाऊंनी यापूर्वीही अनेक निर्णय घेतले आहेत, ज्यातून मुख्यमंत्र्यांमधला संवेदनशील माणूस आपल्याला वारंवार दिसला. अनाथ मुलांसाठी एक टक्का आरक्षण देण्याचा निर्णय असो… महिलांसाठी लाडकी बहिणपासून लखपती दीदीपर्यंतच्या योजना असोत… अपंगांसाठीच्या विविध योजना असोत… प्रत्येक वेळी समाजातील एखाद्या घटकाच्या आयुष्याला आधार देण्याचा प्रयत्न त्यांच्या निर्णयातून दिसला.पण या पलीकडेही काही गोष्टी असतात ज्या आपल्याला माहितही नसतात.प्रीती ताईसारख्या १०० परिवारांचं पालकत्व देवाभाऊंनी स्वीकारलं आहे, हे त्यांनी कधी स्वत: सांगत फिरलं नाही,सोशल मीडियावर त्याची पोस्ट केली नाही. मुलाखतीमध्ये सांगून स्वत:चं कौतुक करून घेतलं नाही.पण जेव्हा कर्तव्य करण्याची वेळ आली, तेव्हा हा भाऊ सगळ्यात पुढे उभा राहिला.बरं..मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून अनेकांना मरणाच्या दारातून परत आणताना आपण त्यांना पाहिलं आहे. महाराष्ट्रातली असो किंवा महाराष्ट्राबाहेरही… एखाद्या बहिणीवर संकट आलं आणि मदतीची गरज पडली, तर रात्रीची वेळ असो किंवा कितीही मोठी अडचण असो, त्या बहिणीसाठी उभा राहणारा संवेदनशील भाऊ आपण पाहिला आहे.आणि आज पुन्हा एकदा तोच भाऊ आपल्या बहिणीच्या लग्नात तिच्या पाठीशी भक्कमपणे उभा होता.लग्न लागल्यानंतर प्रीती ताईंनी जेव्हा आपल्या भावना सांगितल्या, तेव्हाही त्यांच्या डोळ्यात पुन्हा पाणी आलं. आपल्या या दोन भावांबद्दल बोलताना त्यांचा कंठ दाटून आला. आणि आज आपल्या आयुष्याला जी नवी सुरुवात मिळाली आहे, त्याचं श्रेय त्या देवाभाऊंना देत होत्या.खरं तर आज देवाभाऊंना देण्यासाठी धन्यवाद हा शब्दही कमी वाटतो.कारण त्यांनी हे काही प्रसिद्धीसाठी केलं नाही.हा त्यांचा स्वभाव आहे.आणि हा स्वभाव त्यांच्यावर घडलेल्या संस्कारातूनच आला आहे, हे त्यांच्या प्रत्येक निर्णयातून जाणवतं.मुख्यमंत्री म्हणून त्यांचं काम आपण पाहतोच… पण मुख्यमंत्र्यांच्या पलीकडे जाऊन, एखाद्या बहिणीच्या अडचणीच्या वेळी तिच्या पाठीशी उभा राहणारा भाऊ म्हणूनही आपण त्यांना वेळोवेळी पाहिलं आहे.आजचा हा प्रसंग मात्र खरंच मनाला चटका लावून गेलाहा क्षण कदाचित प्रीती ताई आयुष्यभर विसरणार नाहीत.मंगलाष्टके सुरू असताना डोळ्यात आलेले अश्रू, समोर उभा असलेला शिवम, आणि त्या सगळ्या सोहळ्यात तिच्या भावासारखा खंबीरपणे उभा असलेला देवाभाऊ…काही वर्षांपूर्वी ज्या दु:खाने तिचं आयुष्य बदलून टाकलं होतं, त्याच आयुष्याला आज पुन्हा एक सुंदर वळण मिळालं.लग्न लागलं… प्रीती ताई नव्या संसाराला लागल्या… आणि देवाभाऊंच्या चेहऱ्यावरही समाधान दिसत होतंपण अजूनही अशी अनेक कुटुंबं आहेत, ज्यांच्यासाठी ही जबाबदारी सुरू आहे. अजून अनेक बहिणींच्या आयुष्यात असेच आनंदाचे क्षण यायचे आहेत. आणि ते ही लवकरच येतील.प्रीती ताईला तिच्या नव्या आयुष्यासाठी मनापासून खूप खूप शुभेच्छा…आणि तिच्या दु:खाच्या काळात हात धरून, आज तिच्या सुखाच्या क्षणी तिच्या पदराची गाठ बांधून देणाऱ्या आपल्या देवाभाऊंना मनापासून आभार

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ ऑगस्ट २०२६


# राष्ट्रीय एकात्मतेसाठी राजीव गांधीचे बलिदान - डॉ. पंडित नलावडे



**छत्रपती संभाजीनगर :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्व. मा. पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंतीच्या निमित्ताने आज राष्ट्रीय सद्भावना दिवस साजरा करण्यात आला यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक विद्यार्थिनी वैष्णवी यादव हिने सदभावना दिन निमित्ताने विद्यार्थ्यांना शपथ दिली.या कार्यक्रमासाठी प्रा.निखिल भिसे कम्प्युटर विभाग यांनी स्वर्गीय राजीव गांधी यांचे देशाच्या तंत्रज्ञान विकासामधील योगदानावर आपले विचार मांडले.आज भारत हा संगणक शास्त्रात मध्ये विविध क्षेत्रात पुढे असण्या पाठीमागे राजीव गांधी यांची दूरदृष्टी आणि कार्य तितकेच महत्त्वाचे असल्याचे भिसे यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना, प्राचार्य डॉ . पंडित नलावडे यांनी आधुनिक भारताच्या संगणक युगाचे जनक व राष्ट्रीय एकात्मतेसाठी आपल्या जीवाचे बलिदान देणारे स्वर्गीय माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे राष्ट्र उभारणीतील कार्य यावर प्रकाश टाकला राजीव गांधी यांनी देशाला संगणक, परम संगणक निर्मितीमध्ये जे महत्त्वपूर्ण योगदान दिले त्यांच्यामुळेच आज भारत हा संगणक क्षेत्रात विविध विभागांमध्ये कार्यरत असून तरुण पिढी भारताच्या निर्मितीसाठी सतर्क असली पाहिजे असे म्हणाले.भारताच्या जडणघडणीत स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जे पंतप्रधान झाले त्या सर्वांचे योगदान हे खास राहिलेले आहे.पंडित नेहरू पासून मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी पर्यंतच्या सर्व पंतप्रधानांनी आपापल्या कार्यशैलीतून देशाचा विकास घडवण्यासाठीच कार्य केले व वेगवेगळे कार्यक्रम हाती घेऊन ते देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरल्याचे प्राचार्य यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात सांगितले.देशामध्ये राष्ट्रीय एकात्मता टिकून राहिली पाहिजे तरच देशाचा विकास होतो व देशात मैत्रीपूर्ण वातावरण व सदभाव पूर्ण व्यवहार हा असला पाहिजे असे ते म्हणाले. यावेळी, महाविद्यालयातील क्रीडा विभाग प्रमुख प्रभारी डॉ.दिगंबर गंगावणे डॉ.दिलीप बिरुटे डॉ.भास्कर टेकाळे डॉ.पांडुरंग डापके डॉ.प्रशांत देशमुख डॉ.ज्योती आदाने डॉ.संतोष तांदळे डॉ.राजू तुपे डॉ.किशोर लोखंडे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.लक्ष्मीनारायण कुरपटवार डॉ.शिल्पा जीवरग प्रा.गोविंद फड, डॉ.वीरेंद्र सुरासे व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.तुषार कांबळे यांनी केले..

# श्रीकृष्ण महाविद्यालयात सद्भावना दिवस साजरा



**गुंजोटी (प्रा. नागसेन कांबळे) :** येथील श्रीकृष्ण महाविद्यालयात राजीव गांधी यांची जयंती सद्भावना दिवस म्हणून साजरी करण्यात आली .पंतप्रधान राजीव गांधी यांनी त्यांच्या कालखंडामध्ये भारत देशाचा आधुनिक तंत्रज्ञानामध्ये चेहरा मोहरा बदलून दाखवला. संगणक क्षेत्रात क्रांती घडवून आणली .राजीव गांधी यांनीच भारतामध्ये संगणक युगाला सुरुवात केली. त्यांच्या दूरदृष्टी आणि त्यांची समतावादी दृष्टी यातून भारत सर्वच क्षेत्रात कणखरपणे उभा राहून खऱ्या अर्थाने सार्वभौम राष्ट्र म्हणून प्रस्थापित झाला. आपल्या देशात अनेक जाती, धर्म ,पंथ आणि समुदाय राहत असल्यामुळे यांच्यामध्ये सतत शांती, सद्भावना ,मैत्री आणि प्रेम कायम राहावे यासाठी राजीव गांधी यांनी सतत प्रयत्न केले सद्भावनेला सातत्याने अग्रक्रम दिला. त्यांच्यावर विरोधकांनी द्वेष भावनेतून अत्यंत निराधार व गंभीर असे आरोप केले ,परंतु न्यायालयाने त्यांच्या मृत्यूनंतर ही त्यांना निर्दोष म्हणून सिद्ध केले .असा अत्यंत मितभाषी परिपक्व आणि दृष्टेपणा लाभलेला आणि अत्यंत मृदू स्वभाव असणारा पंतप्रधान त्यावेळी भारतासारख्या राष्ट्राला लाभला हे भाग्यच म्हणावे लागेल. त्यामुळे आपण त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा आणि दूरदृष्टी असलेल्या समन्वयाचे स्मरण करणे औचित्याचे ठरेल ,असे भावपूर्ण उद्गार काढून प्रा. डॉ.राजाराम निगडे यांनी राजीव गांधी यांच्या विषयी थोडक्यात माहिती देऊन कार्यक्रमाला सुरुवात केली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून राजीव गांधी यांना अभिवादन केले व त्यांच्या एकूणच कारकिर्दीविषयी थोडक्यात माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापिका व प्राध्यापकेतर सर्व कर्मचारी आवर्जून उपस्थित होते.





महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिवस हा जलसंधारण दिन म्हणून बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या उपक्रमाच्या आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. ओमप्रकाश चव्हाण, डॉ. अभिजीत भुतेकर, डॉ. स्वाती पुरी यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ ऑगस्ट २०२६


## उत्कृष्ट उपविभागीय अधिकारी म्हणून शैलेश लाहोटी यांची सत्कार




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** सेलू उपविभागाचे उपविभागीय अधिकारी (एसडीओ) शैलेश लाहोटी यांची मराठवाडा महसूल विभागातील उत्कृष्ट उपविभागीय अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.जिंतूर पंचायत समितीचे सभापती प्रतिनिधी किशोर खिस्ते पाटील, माजी सरपंच तथा भाजप नेते तथा गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर कैलास खंदारे यांनी लाहोटी यांचे अभिनंदन करून त्यांना शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, कार्यक्षमता आणि उत्कृष्ट प्रशासकीय कार्याची दखल घेत झालेली ही निवड गौरवास्पद असल्याचे यावेळी सांगण्यात आले.महसूल प्रशासनातील विविध कामकाजात कार्यक्षमतेने योगदान देत नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देणाऱ्या लाहोटी यांच्या कार्याचे यावेळी कौतुक करण्यात आले. त्यांच्या पुढील प्रशासकीय वाटचालीस उपस्थितांनी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या.




## झाडे लावा! झाडे लावा!

चला चला रे सारे मिळूनी,<br>
झाडे लावून फुलवू धरणी.<br>
गाता गाता अवनी सजवू,<br>
प्रदूषण टाळू झाडे लावूनी. १

हिरवळ होईल सारी धरणी,<br>
झाडे लावा! झाडे लावा!<br>
लक्षपूर्वक ऐका सांगतो,<br>
एकतरी झाड लावा रे भावा! २

झाडे लावा! झाडे लावा!<br>
नाहीतर भविष्यात भावा.<br>
विचार नेहमी लक्षात ठेवा,<br>
हवा विकत लागेल घ्यावा. ३

म्हणून सांगतो लक्षात ठेवा,<br>
सरणार नाही नैसर्गिक हवा.<br>
विकत घेऊन पुरणार नाही,<br>
कृत्रिम हवा,सांगतो रे भावा! ४

वाटत असेल धरणी आपली,<br>
सुजलाम सुफलाम राहावा.<br>
मनी धरू नका हेवादावा,<br>
सदा आनंदाने झाडे लावा! ५

अरे झाडे लावा! झाडे लावा!<br>
एकच एक ध्यास मनी धरावे.<br>
पावसात मनसोक्त भिजावे,<br>
साऱ्या सृष्टीला समृद्ध करावे.६



**नागेश बोंतेवाड,**<br>
**छत्रपती संभाजीनगर**

## राजेंद्र दाते पाटील यांच्या उपोषणाचा बारावा दिवस; मंत्री विखे-पाटलांच्या अनुपस्थितीने मराठा क्रांती मोर्चाचा संताप

**छत्रपती संभाजीनगर :** मराठा आरक्षणाचे ज्येष्ठ अभ्यासक राजेंद्र दातेपाटील यांच्या आमरण अन्नत्याग उपोषणाचा गुरुवारी (दि. २०) बारावा दिवस उजाडला. प्रकृती चिंताजनक बनलेली असतानाही मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील शहरात येऊनही आंदोलनस्थळी न आल्याने मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. विखे-पाटील यांच्या पी.ए.कडून ते आंदोलन स्थळी भेट देणार असल्याचे सांगण्यात आले होते. सायंकाळी पाचपर्यंत ते येतील, अशी माहितीही देण्यात आली होती. मात्र, रात्री उशिरापर्यंत ते आंदोलनस्थळी पोहोचले नाहीत.यामुळे संतप्त झालेल्या आंदोलकांनी सरकार आणि विखे-पाटील यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. दाते-पाटील यांच्या सात मागण्यांवर सरकारने तातडीने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. निजामकालीन पुराव्यांवरून कुणबी प्रमाणपत्राचा मुद्दा ऐरणीवर मराठवाड्यातील मराठा समाजाला निजामकालीन पुराव्यांच्या आधारे कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी आंदोलकांची प्रमुख मागणी आहे. नोंदी किंवा वंशावळ उपलब्ध नसलेल्या मराठ्यांचे काय, असा सवाल उपस्थित करत नोंदीअभावी मोठ्या संख्येने मराठा समाज प्रमाणपत्रा पासून वंचित राहण्याची भीती आंदोलकांनी व्यक्त केली.हैदराबाद गॅझेटिअरच्या नोंदींसंदर्भातील २ सप्टेंबरचा शासन निर्णय केवळ कार्यपद्धती निश्चित करणारा असून, त्यातून प्रत्यक्षात किती प्रमाणपत्रे मिळाली, याबाबत सरकारने स्पष्टता द्यावी, अशी मागणी करण्यात आली. हैदराबाद गॅझेटिअर लागू आहे की नाही, याबाबत सरकारने ठोस भूमिका जाहीर करावी, अशीही मागणी आंदोलकांनी केली. शैक्षणिक सवलती आणि गुन्हे मागे घेण्याची मागणी ५ जून २०२४ च्या शासन निर्णयात शुद्धिपत्रक काढून ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे मराठा (एसईबीसी) विद्यार्थ्यांना जीआर मधील सर्व शैक्षणिक व नोकरी आणि कर्मचारी यांचे पदोन्नती बाबत सर्व सवलती लागू कराव्यात, अशी मागणी करण्यात आली.दरम्यान, मराठवाड्यात आंदोलनकर्त्यांवर दाखल झालेल्या ६६९ गुन्ह्यांपैकी ४०६ गुन्हे मागे घेतल्याचा दावा प्रत्यक्षात कागदावरच असल्याचा आरोप मराठा क्रांतीमोर्चाच्या समन्वयकांनी केला. आरक्षणाच्या मागणीसाठी आत्महत्या केलेल्या मराठवाड्यातील २७५ आणि राज्यातील ३८४ तरुणांच्या कुटुंबीयांना अद्याप नोकरी व आर्थिक मदत मिळालेली नसल्याचा दावाही करण्यात आला. २०१७ च्या क्रांती मोर्चातील मृतांच्या वारसांकडेही सरकारचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. प्रकृती चिंताजनक; आंदोलन तीव्र करण्याचा इशारा सलग १२ दिवसांच्या अन्नत्यागामुळे डॉ राजेंद्र दाते पाटील यांची प्रकृती चिंताजनक बनल्याचे आंदोलकांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्या नुसार, शुगर ४७ आणि रक्तदाब २२० पर्यंत गेल्याचा दावा करण्यात आला असून डॉक्टरांनी रुग्णालयात दाखल होण्याचा सल्ला दिला आहे. मात्र, मागण्या मान्य होईपर्यंत उपोषण मागे घेणार नसल्याची भूमिका दाते पाटील यांनी कायम ठेवली आहे.“विखे-पाटील यांनी तातडीने आंदोलनस्थळी भेट देऊन सातही मागण्यांवर स्पष्ट भूमिका मांडावी; अन्यथा रक्तदान करून ते रक्त विखे-पाटील यांना पोस्टाने पाठवू,” असा इशारा मराठा क्रांती मोर्चाच्या समन्वयकांनी दिला.डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या प्रकृतीला काही बरे-वाईट झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी सरकारची असेल, असा संतप्त इशारा आंदोलकांनी दिला.बाराव्या दिवशी पोहोचलेले हे उपोषण आता निर्णायक टप्प्यावर आले असून, सरकार दाते पाटील यांच्या मागण्यांवर कोणती भूमिका घेते, याकडे मराठा समाजाचे लक्ष लागले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २२ ऑगस्ट २०२६


## शिवाजी महाविद्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा 'वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार जाहीर



**कन्नड :** महाविद्यातील शैक्षणिक व भौतिक सुविधा, उच्च शिक्षणाची गुणवत्ता, विद्यार्थ्यांचे विविध क्षेत्रांतील कर्तृत्व, संशोधन आणि समाजाभिमुख कार्याची विद्यापीठाने दखल घेत कन्नड येथील श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची 'वसंतराव काळे उत्कृष्ट महाविद्यालय (अनुदानित)' पुरस्कारासाठी निवड केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील बीड, जालना, धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या चार जिल्ह्यांतील सुमारे पाचशे महाविद्यालयांमधून शिवाजी महाविद्यालयाची झालेली निवड कन्नडच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त रविवारी (दि. २३ ऑगस्ट) सकाळी १० वाजता विद्यापीठ नाट्यगृहात होणाऱ्या मुख्य सोहळ्यात महाविद्यालयाला प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. संस्थेचे मार्गदर्शक मा. श्री. मानसिंहजी पवार व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले हे पुरस्कार स्वीकारणार आहेत. विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ या पाच वर्षांच्या महाविद्यालयांच्या गुणवत्तेचे विविध निकषांवर व्यापक मूल्यमापन करून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पुरस्कारासाठी चार जिल्ह्यांतून दहा महाविद्यालयांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली गठित समितीने केलेल्या सर्वंकष मूल्यमापनानंतर अनुदानित विभागातून शिवाजी महाविद्यालयाची निवड करण्यात आली. शिवाजी महाविद्यालयाची निवडीसाठी विद्यार्थ्यांचा निकाल, भौतिक सुविधा, गुणवत्तापूर्ण अध्यापन, शैक्षणिक उपक्रम, संशोधन, प्राध्यापकांचे संशोधनकार्य व संशोधन पेपर, विद्यार्थ्यांचे राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील यश, क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम, सामाजिक बांधिलकी आणि रोजगाराभिमुख उपक्रम अशा विविध निकषांचा विचार करण्यात आला. सुसज्ज वर्गखोल्या, विज्ञान व संगणक प्रयोगशाळा, डिजिटल अध्यापन सुविधा, भाषा प्रयोगशाळा, ग्रंथालय, स्वतंत्र अभ्यासिका, क्रीडा सुविधा आणि हिरवाईने नटलेला परिसर यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक वातावरण अधिक समृद्ध आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात सातत्यपूर्ण कामगिरी करत सांस्कृतिक क्षेत्रात स्वतंत्र ठसा उमटविला आहे. क्रीडा, NCC, NSS तसेच विविध राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश संस्थेच्या सर्वांगीण विद्यार्थी विकासाची साक्ष देणारे आहे. स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन व अभ्यासिका, पोलीस भरतीसाठी मैदानी व लेखी परीक्षेची तयारी आणि ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कामही महाविद्यालयात सुरू आहे. अग्निवीर भरतीत आनेक विद्यार्थ्यांची झालेली निवड ही या प्रयत्नांना मिळालेली पावती आहे.महाविद्यालयाने शिक्षणाला समाजाशी जोडण्यावरही सातत्याने भर दिला आहे. कृषी मंच, माती परीक्षण प्रयोगशाळा, पर्यावरण संवर्धन, वृक्षलागवड, बॉटनिकल गार्डन, 'ऑक्सिजन पार्क', वाचनसंस्कृती विषयक उपक्रम, NSS आणि रेड रिबन क्लब यांच्या माध्यमातून विविध सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात.पर्यावरण संवर्धनाच्या कार्याची दखल घेत महाविद्यालयाला महाराष्ट्र शासनाचा 'छत्रपती शिवाजी महाराज वनश्री राज्यस्तरीय पुरस्कार' प्राप्त झाला आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, कौशल्याधिष्ठित शिक्षण, संशोधन, करिअर मार्गदर्शन आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत महाविद्यालयाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या दिशेनेही वाटचाल सुरू ठेवली आहे. शिवाजी महाविद्यालयाचा हा गौरव केवळ एका संस्थेचा पुरस्कार नसून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता आणि प्रतिभेला मिळालेली विद्यापीठीय सन्मान आणि मान्यता आहे. वर्धापनदिनाच्या मुख्य सोहळ्यास यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून कुलगुरू डॉ. विजय फुलारी अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. यावेळी ज्येष्ठ सनदी अधिकारी श्री. भास्कर शंकरराव मुंढे यांना जीवनसाधना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. प्रकुलगुरू डॉ. प्रवीण वक्ते, कुलसचिव डॉ. प्रशांत अमृतकर, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. गजानन सानप, प्राचार्य डॉ. भारत खंदारे यांच्यासह विद्यापीठातील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक श्री. मानसिंहजी पवार, अध्यक्षा श्रीमती संजीवनी मानसिंह पवार, उपाध्यक्ष श्री. कृष्णा पाटील, सचिव श्री. चंद्रकांत देशमुख, कोषाध्यक्ष श्री. बाबासाहेब मोहिते, ज्येष्ठ संचालक डॉ. पी. के. निकम, डॉ. ए. के. महाले तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळाने आनंद व्यक्त केला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले,उपप्राचार्य डॉ. भाऊसाहेब मगर, IQAC समन्वयक डॉ. विजय मातकर, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी आणि सेवकवर्ग यांच्या सामूहिक प्रयत्नातून हे यश संपादन झाल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

## उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचा रुग्णांसाठी हेल्पलाईन क्रमांक जाहीर

**बीड (भगवंत पाळवदे) :** सुधारित वृत्त : जिल्हाधिकारी कार्यालयातील तळ मजल्यावर असलेल्या राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांच्या कार्यालयात उपमुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष स्थापन करण्यात आला आहे. गंभीर आजारांशी लढणाऱ्या गोरगरीब व गरजू रुग्णांना तातडीने आर्थिक मदत मिळवून देणे, हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या सुविधेसाठी या कक्षाचा विशेष हेल्पलाईन क्रमांक 9657355113 जारी करण्यात आला आहे. या वैद्यकीय सहायता कक्षामुळे जिल्ह्यातील गरजू रुग्णांना उपचारासाठी लागणाऱ्या शासकीय योजनांची माहिती मिळणे आणि उपमुख्यमंत्र्यांच्या वैद्यकीय सहायता निधीतून मदत मिळणे अधिक सोपे होणार आहे. कोणत्याही वैद्यकीय मदतीसाठी किंवा मार्गदर्शनासाठी नागरिकांनी या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे


मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

**साहिल कॉम्प्युटर्स अँड प्रिंटर्स**

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

**डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)**

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्पायरल व हार्ड बायडींग
- डेझर्टेशन
- कलर प्रिंट
- स्कॅनिंग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ट कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com


## निधन वार्ता



**दौलताबाद :** लिलाबाई गोपीनाथ खंडागळे वय ८० वर्ष राहणार अब्दीमंडी यांचे वृद्धपकाळाने दि २० ऑगस्ट रात्री दहा वाजता निधन झालेत्यांच्या वर दि २१ ऑगस्ट रोजी सकाळी अकरा वाजता अब्दीमंडी येथील समशांन भूमीत करण्यात आलेत्यांचा पश्चात चार मुले,तीन मुली,सुना नातवंडे असा परिवार आहेत्या माजी सरपंच लक्ष्मीबाई विलास खंडागळे यांच्या सासू होते


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002